# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

वाचा : क्र. बीजीए/पेन्शन/०१/२०२३, दि. १० जानेवारी, २०२३

## प रि प त्र क

दिनांक:- २७ मे २०२४

क्र.बीजीए/पेन्शन/०५/२०२४.

सर्व नियंत्रण अधिकारी/कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, दि. ३० एप्रिल २०२४ रोजी मा. कुलगुरू कार्यालयाचे समिती कक्ष सभागृहामध्ये सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे निरोप/सत्कार समारंभात मा. कुलगुरू यांनी निर्देश दिल्याप्रमाणे आपले आस्थापनेवर काम करित असलेले सेवानिवृत्त होणारे अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांना सेवानिवृत्तीवेतन अंतिम प्रदेय आदेश निर्गमित करण्याबाबत निर्देश दिलेले आहे.

उपरोक्त संदर्भिय परीपत्रकानुसार यापुर्वी या कार्यालयामार्फत सेवानिवृत्तीवेतन प्रकरणे वेळेत निकाली काढण्याबाबत तसेच त्रुटीमुक्त सेवानिवृत्ती प्रकरण सादर होण्याकरीता परीपत्रकासह तपासणी सुची **(Check List)** सर्व कार्यालयास पाठविण्यात आलेली आहे. परंतू बऱ्याच कार्यालयामार्फत तपासणी सुची प्रकरणासोबत जोडलेली आढळुन येत नाही. तेव्हा सेवानिवृत्तीप्रकरणासोबत सदर तपासणी सुची न चुकता जोडण्यात यावी जेणेकरून सेवानिवृत्तीवेतन प्रकरणामध्ये त्रुटी राहण्याची शक्यता कमी होईल.

असेही निदर्शनास आले आहे की, सबंधित कार्यालय प्रमुख सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्तीवेतन विषयक प्रकरणे वेळेत तयार करून अंतिम मंजुरीसाठी विद्यापीठ प्रशासनास सादर करीत नसल्यामुळे सेवानिवृत्त विद्यापीठ अधिकारी/कर्मचाऱ्यांची सदर प्रकरणे निकाली काढण्यास विलंब होतो. परिणामी संबंधित सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना देय असणारे सेवानिवृत्तीवेतनविषयक लाभाचे वितरण वेळेत प्रदान करणे शक्य होत नाही.

म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम १९८२ च्या नियम १२२ नुसार कार्यालय प्रमुखांनी शासकिय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपुर्वी जास्तीत जास्त सहा महिन्याच्या आत नमुना ६ चा भाग एक पुर्ण करणे क्रमप्राप्त आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयाद्वारे सेवानिवृत्त होत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्त होण्याच्या सहा महिन्यापुर्वी पुर्वसुचना निर्गमित केल्या जातात. सदर सुचना निर्गमित झाल्यापासुन सेवानिवृत्ती प्रकरण सादर करण्याची तयारी करणे अपेक्षित आहे परंतू असे होत असल्याचे आढळुन येत नसल्यामुळे आपणास पुनश्चः एकदा सुचित करण्यात येते की सेवानिवृत्तीवेतन प्रकरण उपरोक्त उल्लेखित तपासणी सुचीसह संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे सेवानिवृत्ती पुर्वी सेवानिवृत्तीवेतन प्रकरण या कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे जेणेकरून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांचे हक्काचे सेवानिवृत्तीवेतन विषयक लाभ वेळेवर प्रदान करणे सोईचे होईल.

उपरोक्त नमुद नुसार से.नि.वे. प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त न झाल्यास होणाऱ्या विलंबास संबंधित कार्यालय प्रमुख जबाबदार राहतील.

मा. कुलगुरू यांचे मंजुरी व आदेशान्वये.

स्वाक्षरीत/-
कुलसचिव
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

**प्रत:- माहिती व योग्य कार्यवाहीकरिता रवाना.**

१) नियंत्रक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.
२) नियंत्रक अधिकारी,(सर्व)
३) कार्यालय प्रमुख सर्व
४) अधिदान व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/नागपूर.
५) प्रभारी अधिकारी, संगणक विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
६) मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहायक यांना मा. कुलगुरू महोदयांचे माहितीकरीता.

२८/०५
कुलसचिव
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

## तपासणा सुचा (Check List)

**सेवानिवृतीवेतन प्रकरण तयार करून कुलसचिव कार्यालयास मंजुरीकरिता पाठविण्यापुर्वी खालील बाबींची पुर्तता झालेली आहे यांची खात्री करून घेण्यात यावी.**

| अ.क्र | तपासावयाच्या बाबी | होय/नाही |
|---|---|---|
| १ | मुळसेवापुस्तकातील प्रथम पृष्ठावरील इतर सर्व नोंदी तसेच जन्मतारखेबाबतची नोंद स्वतंत्ररित्या साक्षांकित केलेली आहे का ? | होय/नाही |
| २ | प्रथम नियुक्ती झालेल्या पदाची व त्या पदावर रूजु झाल्याची नोंद विद्यापीठ आदेश क्र. व दिनांकासह घेतलेली आहे का ? | होय/नाही |
| ३ | प्रथम नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचारी वैद्यकिय दृष्टया काम करण्यास सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात घेतलेली आहे का ? | होय/नाही |
| ४ | दि. ०१.०४.१९७६, १९८६,१९९६, २००६ व २०१६ ला झालेल्या सुधारीत वेतननिश्चितीची (Pay Fixation Approval) नोंद तसेच इतर वेतनविषयक नोंदी लेखाधिकारी, स्थानिक निधी लेखा डॉ् पं.दे.कृ.वि., अकोला यांचे कडुन पडताळणी केल्याची नोंद मुळसेवापुस्तकात घेतलेली आहे का? | होय/नाही |
| ५ | प्रथम स्तरावर सरळसेवेद्वारे झालेल्या नियुक्तींचा परिविक्षा कालावधी (ProbationPeriod)समाधानकारक पार पाडल्याची नोंद मुळसेवापुस्तकात घेतलेली आहे का? | होय/नाही |
| ६ | संपुर्ण अर्हताकारी सेवेचा कालावधी पडताळल्याची नोंद (Service Verification) मुळसेवापुस्तकात घेतलेली आहे का? | होय/नाही |
| ७ | देय झालेल्या रजेचा हिशेब पुन्हा तपासणी करून त्यानुसार रजेच्या नोंदी सेवापुस्तकामध्ये घेतल्या आहेत किंवा नाही याची खात्री करून घ्यावी. अर्जित रजेच्या हिशोबाची नव्याने बेरीज (Recasting) करण्यात आलेली आहे का? | होय/नाही |
| ८ | वार्षिक वेतनवाढ (Incrememt) नियमितपणे दिल्या गेली किंवा नाही. | होय/नाही |
| ९ | सेवानिवृत्ती पुर्वसुचना तसेच आदेशाची नोंद सेवापुस्तकात घेतलेली आहे का. ? | होय/नाही |
| १० | विद्यापीठ अभियंता/विद्यापीठ ग्रंथपाल/डॉ. पं.दे.कृ.वि., कर्मचारी सहकारी पतसंस्था यांचे "ना-हरकत प्रमाणपत्र" तसेच कार्यालयीन कोणत्याही प्रकारची वसुली नसल्यास नादेय प्रमाणपत्र प्रकरणासोबत जोडलेले आहे का? | होय/नाही |
| ११ | अंतिम वेतन प्रमाणपत्र (LPC) प्रकरणासोबत जोडलेली आहे का? | होय/नाही |
| १२ | अर्जित रजेचे रोखीकरण केल्यानंतर त्याबाबची नोंद मुळसेवापुस्तकात घेवुन रजेचा हिशोब निरंक केल्याची नोंद घेतलेली आहे का? | होय/नाही |
| १३ | "ना-विभागीय चौकशी" व ना- मागणी प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्यांचे स्वाक्षरीने व नियंत्रण अधिकाऱ्याचे प्रतिस्वाक्षरीने सादर केलेले आहे का? | होय/नाही |
| १४ | निवृत्तीवेतन प्रकरणामध्ये आवश्यक त्या ठिकाणी साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या तसेच ठिकाण व दिनांक नमुद करण्यात आले आहे काय? | होय/नाही |
| १५ | मुळसेवापुस्तकात कार्यमुक्त/पदमुक्त केल्याबाबतची नोंद घेण्यात आली आहे का? | होय/नाही |
| १६ | सेवानिवृत्तीवेतन प्रकरणासोबत अंशराशीकरण अर्ज जोडुन त्यावर संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यानी अर्ज सादर केल्याची दिनांक नमुद केलेली आहे का? | होय/नाही |
| १७ | नियंत्रक यांचे परीपत्रक क्र. अप्रवि/पेन्शन/७२५/२०२१, दि. १७.०८.२०२१ अन्वये स्थायित्व प्रमाणपत्राची नोंद मुळसेवापुस्तकात घेण्यात आलेली आहे का? | होय/नाही |
| १८ | सातव्या वेतन आयोगानुसार थकबाकी प्रदान केल्याची नोंद मुळसेवापुस्तकात घेण्यात आलेली आहे का? | होय/नाही |
| १९ | सेवानिवृत्तीवेतन प्रकरणामध्ये नमुद नामनिर्देशित सदस्यांची जन्मतारखेबाबतचे पुरावे प्रकरणासोबत जोडलेले आहे का? | होय/नाही |
| २० | शासन परीपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दि. २२.११.२०२१, तसेच परीपत्रक दि. ०७.१०.२०२२ व परीपत्रक दि. १७.०८.२०२३ अन्वये अतिप्रदान रकमेच्या अनुषंगाने संबंधित सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे कडुन शासन निर्णयासोबत जोडलेले वचनपत्र सेवानिवृत्ती प्रकरणासोवत द्विप्रतित जोडण्यात यावे. | होय/नाही |

आहरण व संवितरण अधिकारी　　　　　　　　　　कार्यालय प्रमुख